# प्रेसनोट तारीख ०४/०४/२०२३

## शिरगाव परंदवडी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

### मौजे शिरगाव ता. मावळ, जि. पुणे, येथे प्रती शिर्डी मंदिरासमोर गावचे सरपंच यांचेवर कोयत्याने वार करुन पळुन गेलेले आरोपींना अटक

## शिरगाव परंदवडी पोलीस स्टेशन पथकाची कामगिरी

-------------------oo------------------

**शिरगाव परंदवडी पोलीस स्टेशन हद्दीमधील मौजे शिरगाव, प्रति शिर्डी मंदिराचे समोर रोडवर ता. मावळ, जि. पुणे येथे गावचे सरंपच प्रविण साहेबराव गोपाळे रा शिरगाव ता मावळ जि पुणे हे मंदिराचे समोर यांचे मोटार सायकल वर बसलेले असताना गाडीवर ०३ अज्ञात इसमांनी येवुन त्यांचेवर धार धार कोयत्याने वार करुन निघृण खुन करुन मोटार सायकलवरुन फरार झालेले होते त्या अनुषंगाने शिरगाव परंदवडी पोलीस स्टेशन गु. रं.नं. ९६/२०२३ भादवी ३०२, १२० (ब), ३४ प्रमाणे दिनांक ०१/०४/२०२३ रोजी सदर इसमा विरुध्द गुन्हा दाखल आहे.**

सदर गुन्हयाचा अधिक तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक वनिता धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली शिरगाव परंदवडी पोलीस स्टेशन येथे नेमणुकीस असलेले पोउपनि गाडीलकर, पोहवा/४७१ टी. सी. साबळे, पोना/१२३१ एस.बी.घाडगे पोना/१२५० वाय. जे. नागरगोजे, पोअंम/२२४१ एस.एल.फडतरे व पोअंम/२५७६ डी व्ही राठोड यांनी सुरु केला असता वपोनि वनिता धुमाळ सो यांना त्यांचे गुप्त बातमी दारा मार्फत माहिती मिळाली कि, सदर गुन्हयातील आरोपी हे हिंजवडी कासारसाई रोडला डोंगराचे बाजुला थांबलेले आहेत अशी माहिती मिळाल्याने. सदर ठिकाणी पोउपनि गाडीलकर पोहवा/४७१ टी.सी.साबळे, पोना/१२३१ एस. बी. घाडगे, पोना/१२५० वाय. जे. नागरगोजे, पोअंम/२२४१ एस.एल.फडतरे व पोअंम/२५७६ डी.व्ही.राठोड यांनी जावुन सापळा रचुन अतिशय शिताफिने यातील लपुन बसलेल्या ठिकाणावरुण एकुण ०३ जनांना ताब्यात घेतले. त्यांचेकडे चौकशी करुन त्यांना गुन्हयामध्ये अटक केली आहे. अटक केलेले आरोपी नामे **१) विशाल ऊर्फ किरण सुनिल गायकवाड वय २५ वर्षे, रा. शिरगाव, ता.मावळ, जि.पुणे २) संदिप ऊर्फ अण्णा छगन गोपाळे वय ३१ वर्षे, रा शिरगाव, ता मावळ, जि पुणे ३)ऋतिक शिवाजी गोपाळे वय २२ वर्षे, रा शिरगाव, ता मावळ, जि पुणे यांना अटक करण्यात आलेले** सदर गुन्हयाचा अधिक तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक वनिता धुमाळ हे करत असुन सध्या आरोपी पोलीस कस्टडी मध्ये आहेत.

**सदरची कारवाई पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे सो, सह. पोलीस आयुक्त श्री मनोजकुमार लोहिया सो, अपर पोलीस आयुक्त श्री डॉ संजय शिंदे सो, पोलीस उप आयुक्त श्री डॉ. काकासाहेब डोळे सो, सहा. पोलीस आयुक्त, देहुरोड विभाग, श्री पद्‌माकर घनवट सो, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिरगाव परंदवडी पो.स्टे. वनिता एस धुमाळ, पोउपनि गाडीलकर, पोहवा/४७१ टी. सी. साबळे, पोना/१२३१ एस.बी.घाडगे पोना/१२५० वाय. जे. नागरगोजे, पोअंम/२२४१ एस.एल.फडतरे व पोअंम/२५७६ डी व्ही राठोड यांनी केलेली आहे.**

(डॉ.काकासाहेब डोळे)
पोलीस उप आयुक्त
परिमंडळ-०२, पिंपरी चिंचवड शहर